# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक-५
## सन.२००७-२००८

विषय क्रमांक :- १ मंगळवार दिनांक :२६/६/२००७

ठराव क्रमांक :- १ मंगळवार दिनांक : २६/६/२००७

**प्रस्तावाचा विषयः-**मा.स्थायी समिती सभा दिनांक२५/५/२००७रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक २५/५/२००७ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं. :- वार्षिक टेंडर मंजूरीचे वेळी चर्चा न करता विषय मंजुरीस मी विरोध नोंदविला होता. सदर निविदा मंजूरीने होणा-या आर्थिक नुकसानीस जबाबदार कोण?

सहाय्यक आयुक्त मा.श्री.देशमुख साहेब :- मुख्य लेखा परिक्षक सदर प्रकरणी तपासणी करून आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करतील.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- आलेले दरास अंतिम मंजूरी स्थायी समिती देते, आपण पंचवीस लाखाची औषधे खरेदी करतो. मानांकित आणि कमी किंमत असलेली औषधे खरेदी केल्यास मनपाचा आर्थिक फायदा होईल. कंपण्या औषधी गोळया स्ट्रीप चे स्वरूपात तसेच पावडर चे स्वरूपातही विक्री करतात. त्यांचे किंमती मध्ये फरक असतो. आपले कडेस बॉम्बे मार्केटची औषधे आल्यास नागरिकांचे आरोग्यास धोका निर्माण होउ शकतो. सिव्हील हॉस्पीटल, जिल्हा परिषद यांचे दर करार पहावे. शासनाच्या दराप्रमाणे मानांकित कंपनीची औषधे खरेदी करावीत.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- मानांकित कंपनीची औषधे खरेदी करावीत.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- औषध खरेदीचे निविदा बाबतचे ऑफीस रिपोर्टमध्ये औषधाचे नंबर टाकलेले होते. कंपन्याची नावे दिलेली नव्हती.

स्टोअर विभाग लिपिक श्री. आढाव :- कंपन्याची नांवे टाकलेली आहेत.

मा.श्री.जोशी अ.सु. :- टेंडर नोटीस मध्ये नांवे टाकलेली आहेत.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- मानांकित कंपणीची औषधे मागवावीत महाग असलेली औषधे रूग्णास दिली जातात त्याच्या नोंदी रूग्णाचे नांवासह ठेवण्यांत याव्यांत व त्या विषयीचा अहवाल दरमहा मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यांत यावा. खाजगी हॉस्पीटल मध्ये साधी ॲस्पिरीनची गोळी दिली तरी त्याची नोंद केली जाते.

सहा.आयुक्त मा.श्री.देशमुखः-सदर विषयी आपण आपले हॉस्पीटलामध्ये जाउन तपासणी करू शकतो

मा.श्री. जोशी अ.सु. :- आपण प्रत्यक्ष जाउन तपासणी केली तर सदर बाबतीत आपणास त्याची माहिती मिळेल आपण कधीही तपासणी करू शकतो.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- बॉम्बे मार्केटची कमी प्रतीची औषधे आल्यास आपले नुकसान होईल.

सहाय्यक आयुक्त मा.श्री. देशमुख साहेब :- आपण कधीही तपासणी करून कार्यवाही करू शकतो.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- आपण रूपये ६५ हजार किंमत असलेली कंपणीची बेअरींग ३५ हजारामध्ये खरेदी करतो.ओरीजीनल माल आपणाकडेस येतो का? एस.के.एफ बेअरींगचे पुरवठादार अधिकृत डिलर नाहीत.

मा.श्री. जोशी अ.सु. :- आलेले निविदा दराचा तुलनात्मक तक्ता मंजूरी साठी प्रशासनाने आपले समोर सादर केला आहे. दर मंजूर करणे स्थायी समितीचा अधिकार आहे. ही कार्यालयीन प्रोसिजर आहे.अनियमितता आपण कधीही तपासून त्या वर कारवाई करू शकतो.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं :- वार्षिक टेंडर मागविणेस मा.स्थायी समिती ची मंजूरी घेतलेली नाही.ती घेणे आवश्यक आहे.वार्षिक खरेदीची यादी कोण ठरवितो.

मुख्य लेखा परिक्षक श्री.कदम अ.ए.:- प्रशासकीय मंजूरी नुसारच प्रस्ताव मंजूरीसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे सादर केलेला आहे.

स्टोअर विभाग लिपिक श्री. आढाव :- प्रशासकीय मंजूरी घेउनच निविदा दर मागविलेले आहेत. खरेदी करावयाच्या वस्तुची औषधाची नांवे इत्यादी माहिती संबंधीत विभाग सुचवितो.

मा.श्री.शेख मुदस्सर अ.इ. :- चांगली स्टॅन्डर्ड कंपणीची औषधे इत्यादी घ्यावीत.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं.:- बोगस कंपणी च्या निविदा कशा स्विकारता. स्पेअरपार्ट इत्यादी खरेदी करावयाच्या वस्तु स्टॅन्डर्ड कंपणीच्या ओरिजीनल स्पेअरपार्ट, वस्तु इत्यादी स्विकारणे ची जबाबदारी स्टोअर विभागाची आहे.म.न.पा. मार्फत होणारे वार्षिक खरेदी चे वेळी कंपणीचे लेटर हेड वरील बील घेणेत यावे.

मा.श्री. घुले अ.ह. व मा.श्री. बोरूडे अ.ब. :- त्याप्रमाणे टेंडरचे मंजूर ठरावामध्ये दूरूस्ती समविष्ठ करून मागील सभेचे कार्यवृत्त कायम करणेत यावे.

मा.सभापती साहेब :- दवाखान्याचे मुख्य डॉक्टरांना सभेमध्ये बोलावण्यांत यावे.

त्या प्रमाणे डॉक्टर श्री. टेकवाणी पी.आर.हे सभे मध्ये उपस्थित झाले.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- आपण औषधांची एकूण कितीची खरेदी करतो.

डॉक्टर श्री. टेकवाणी पी.आर. :- एकूण एकोणतीस लाखा पर्यत औषधांची खरेदी आपण करतो. फॅमिली प्लॅनिंग आपण मोफत करतो. इमरजन्सी केस मध्ये आपण आपली औषधे वापरतो इतर वेळी पेशन्टलाच औषधे आणावयास सांगतो.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- स्टॅन्डर्ड कंपनीचीच औषधे आपण खरेदी करतो का?

डॉक्टर श्री. टेकवाणी पी.आर.:- या यादी मधील सर्व औषधे ही स्टॅडर्ड कंपनीचीच असून औषधे स्विकारते वेळी मी स्वता: समक्ष पहाणी, तपासणी करतो. अन्य व कमी प्रतीचा माल स्विकारला जात नाही.

मा.श्री.त्रिपाठी सु.च.: औषधे खरेदीस प्रशासकीय मान्यता घेतलेली नाही तो मी तत्काळ रिजेक्ट करतो

सहा. आयुक्त मा.श्री. देशमुख साहेब :- प्रशासकीय मंजूरी घेतल्या शिवाय टेंडर मागविले जात नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- दहा लाखाचे पुढील खरेदीस मा.स्थायी समिती ची मंजूरी घेण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभेचे दिनांक २५/५/०७ रोजीचे वार्षिक खरेदी विषयी पारित केलेल्या ठरावामध्ये मंजूर निविदाकार यांचे कडून स्टोअर पोहोच होणा-या औषधे, साहित्य, माल इत्यादीचे मानांकित कंपणीचे लेटर हेड वरील बिल घेण्यांत यावे या शर्तीचा समोवश करून मा.स्थायी समिती सभा दिनांक २५/५/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

**प्रस्तावाचा विषयः-**मा.स्थायी समिती सभा दिनांक२५/५/२००७रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे

**ठराव** :- मा.स्थायी समिती सभा दिनांक २५/५/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी सभे मध्ये झालेल्या चर्चे नुसार दिनांक २५/५/२००७ रोजीचे सभेचे अजेंडया वरील विषय क्रमांक दोन अहमदनगर महानगरपालिकेस सन २००७-२००८ साला करिता दैनंदिन कामकाजासाठी एस.के.एफ बेअरींग, औषधे इत्यादी वार्षिक खरेदी विषयी पारीत केलेल्या ठरावा मध्ये मंजूर निविदा कार यांचे कडून स्टोअर पोहोच होणा-या साहित्य माल इत्यादी चे मानांकित उत्पादक कंपणीचे लेटर हेड असलेले बील घेण्यांत यावे या प्रमाण शर्तीचा समावेश करून मा.स्थायी समिती सभा दिनांक २५/५/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री.घुले अ.ह.

अनुमादेक :- मा. श्री.बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ५**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक :- २ मंगळवार दिनांक : २६/६/२००७

ठराव क्रमांक :- २ मंगळवार दिनांक : २६/६/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दी मधील झोपडपट्ट्या मध्ये एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (I.H.S.D.P.) राबविणे कामी आर्किटेक्ट / कंन्सलटंन्ट नेमणे करीता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** उरापेक्त विषय संदर्भाकींत विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, विषयात नमुद केल्या प्रमाणे महानगरपालिका हद्दीत एकूण २२ झोपडपट्ट्या असून त्यापैकी १७ घोषित व ५ अघोषित आहेत. दिनांक २६/७/२००६ रोजी मा.आयुक्त साहेब यांचे दालनात बैठक घेण्यांत आली त्यावेळी असे नमुद करण्यांत आले की, सुरूवातीस ५ झोपडपट्ट्याचे काम हाती घ्यावे १] वैदूवाडी २] संजय नगर ३] सावेडी गांवठाण ४] सिध्दार्थ नगर ५] बुरूडगांव रोड इत्यादी तद्नंतर उर्वरीत झोपडपट्ट्या येतात.

उपरोक्त विषयांकित काम करणेसाठी दिनांक १५/२/२००७ च्या दैनिक लोकमत व सामना या वर्तमान पत्रात फेर जाहीर निविदा क्र.१ अन्वये प्रसिध्दी देउन दिनांक १५/२/२००७ ते दि.२६/२/२००७ अखेर निविदा (नमुद फी चे दर) सिलबंद पाकिटातून महानगरपालिका कार्यालयात देण्या बाबत मागविण्यात आल्या होत्या मुदतीत एकूण १२ सिलबंद निविदा (पाकिट) प्राप्त झालेले आहेत. प्राप्त झालेले निविदा मा.उपायुक्त (सा) यांचे दालनात दि.२७/२/२००७ रोजी उघडण्यांत आल्या त्या वेळी आर्किटेक्ट मनोज जाधव, अशोक काळे, सरनाईक, दिलीप काळे व अरविंद लातुरे हे उपस्थीत होते त्या प्रमाणे उघडलेल्या निविदांचा फी च्या दराचा तुलणात्मक त्तक्ता खालील प्रमाणे

आर्किटेक्टने करावयाची कामे.

१.झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करणे
२.आराखडे, नकाशे.
३.अंदाजपत्रके
४.संबंधीत शासकीय विभागाकडे संपूर्ण प्रस्ताव तयार करून त्यास तांत्रिक प्रशासकीय मंजूरी घेणे इत्यादी
५.कामावर तांत्रिक देखरेख ठेवणे.

| अ.नं | आर्किटेक्ट यांचे नांव | फी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | शेळके ॲन्ड साळुंके असो. अ.नगर | ३ % | १] नकाशे व अंदाज पत्रके तयार करणे १.००%<br>२] सुपर व्हिजन चार्जेस २.०० % + सर्व्हिस टॅक्स १२ % |
| २ | सदाशिव हडप ॲन्ड असो. देवळाली प्रवरा ता.राहुरी, अहमदनगर | १.८३% | -- |
| ३ | पवन टेक्नो. कंन्सलटंन्ट, लातुर | ३.९०% | १]सर्व्हेक्षण करणे, नकाशे तयार करणे ०.५०%२] सविस्तर नकाशे, प्रत्यक्ष कामाच्या नकाशासहडिझाईन,मोजमापे अंदाजपत्रकाच्या४प्रती सह २.००%३]कामावर देखरेख करणे १.४०%+सर्व्हिस टॅक्स व तर टॅक्स |
| ४ | दिलीपजी काळे ॲन्ड असो. पुणे | ४% | -- |
| ५ | अविष्कार ग्रुप, अहमदनगर | २.२५% | १] सर्व्हेक्षण करणे २] आराखडे नकाशे तयार करणे ३] अंदाजपत्रके तयार करणे ४] तांत्रिक मंजूरी घेणे इत्यादी करिता प्रतेंकी ०.५ % ब ५] कामावर देखरेख करणे ०.२५ % |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | अशोक काळे ॲन्ड असो. अ.नगर | १.४७% | --------------------- |
| ७ | तरे ॲन्ड असो. सातपुर, नाशिक | ०.९३% | + सर्व्हिस टॅक्स |
| ८ | किर्लोस्कर कंन्सलटंन्ट लि. पुणे | ४.७५ % | + सर्व्हिस टॅक्स |
| ९ | मे. सरनाईक कंन्सलटंन्ट, अ.नगर | १.८० % | ------------------------------ |
| १० | लॅण्ड मार्क कंन्स्ट्रक्शन, राहुरी | ३.५% | -------------------------- |
| ११ | संजय वाघचौरे ॲन्ड असो. श्रीरामपूर | ३.७५% | ------------------------- |
| १२ | विशाल साळुंके ॲन्ड असो. श्रीरामपूर | २.२५% | १] सर्व्हेक्षण करणे २] आराखडे नकाशे तयार करणे ३] अंदाजपत्रके तयार करणे ४] प्रस्ताव शासकीय विभागाकडे सादर करणे ५] प्रशासकीय मंजूरी घेणे ६] तांत्रिक मंजूरी घेणे इत्यादी करिता प्रर्त्तेकी- ०.२५%ब कामावर तांत्रिक देखरेख करणे ०.७५ % |

वरील तुलणात्मक तक्ता पाहता प्राप्त १ ते १२ निविदा पैकी तरे ॲन्ड असो.सातपुर, नाशिक यांचे दर स्पर्धात्मक दृष्टया इतर निविदा पेक्षा सर्वात कमी म्हणजे ०.९३ %+ सर्व्हिस टॅक्स असे आहेत. तरी कमी दराच्या निविदा धारकाशी वाटाघाटी करणे योग्य वाटते तरी आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.९/३/०७

अंतर्गत लेखा परिक्षक :- Ncgociation करिता बोलावणेस हरकत नाही . दि.९/३/०७

मा.उपायुक्त साहेब (सा) :- छाननी समिती समोर ठेवा.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- सर्वात कमी दराच्या निविदा धारकाशी दराबाबत दि.१४/३/०७ रोजी मा.उपायुक्त (सा) यांचे समोर वाटाघाटी केल्या ठेकेदाराने प्रकल्प किंमतीच्य ०.७८ %+ सर्व्हिस टॅक्स या दरा मध्ये काम करण्यांस दि.१४/३/०७ रोजी लेखी संम्मती दिली आहे. निर्णयास्तव सादर दि. १४/३/०७

मा.उपायुक्त साहेब (सा) :- छाननी समिती समोर ठेवा. दि.१५/३/०७

सादर,

निविदा दर पत्रके छाननी समितीच्या दि. १५/३/०७ रोजी झालेल्या बैठकीत सदरचे काम श्री. तरे ॲन्ड असो. सातपुर, नाशिक यांना प्रकल्प किंमतीच्या ०.७८ %+ सर्व्हिस टॅक्स या दराने देण्याबाबत समिती ने शिफारस केलेली आहे. मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल फेर सादर असे.

शहर अभियंता :- छाननी समितीच्या शिफारसी नुसार सदर काम श्री. तरे ॲन्ड असोसीएशन यांना प्रकल्प किंमतीच्या ०.७८ %+ सर्व्हिस टॅक्स या प्रमाणे देणे योग्य वाटते. दि. १६/३/०७

अं.लेखा परिक्षकः-निविदा दर छाननी समितीचे प्रस्ताव'अ'प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही. दि.२०/३/०७

मा.उपायुक्त साहेब(सा):-प्रस्ताव मंजूरीसाठी मा.स्थायी समिती समोर पाठविणेस हरकत नाही. दि.२०/३/०७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.२०/३/०७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दी मधील झोपडपट्टया मध्ये एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (I.H.S.D.P.) राबविणे कामी आर्किटेक्ट / कंन्सलटंन्ट नेमणे करीता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.जोशी अ.सु.:-सदर प्रकरणा बाबत माहिती सांगावी या कंपनीला अशा कामाचा अनुभव आहे का?

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- ही योजना राबविणे कामी सर्व्हे करणे,नकाशे एस्टीमेट तयार करून योजनेस मा.राज्य व केंद्र शासनाची मंजूरी घेउन योजना राबविणेसाठी आर्किटेक्ट / कंन्सलटंट नेमणे साठी निविदा मागविल्या आहेत.

मा.श्री.त्रिपाठी सु.च. :- सर्व्हिस टॅक्स आपण देणार का? या कंपनीला कामाचा किती अनुभव आहे.त्यांनी पूर्ण केलेल्या योजना त्याचे कडील स्टाफ ची माहिती द्यावी.

शहर अभियंता श्री.मगर एन.बी. :- सदर योजना पुर्ण झाल्या शिवाय त्यांना पेमेंट केले जाणार नाही.असे सांगून त्यांनी कमीचे निविदा दर धारक यांचे कडेस असलेल्या स्टाफची माहिती सांगितली.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं:- समक्ष संस्थेस काम दिल्यास योजना लवकर पूर्ण होईल.

सहाय्यक आयुक्त मा.श्री.देशमुख साहेब :- हा शंभर टक्के अनुदानाचा विषय आहे.

शहर अभियंता श्री.मगर एन.बी. :- मा.सभेने त्वरेने निर्णय घेतल्यास सदर योजनेची कामे लवकर होतील कमीचे निविदा दर धारक यांनी केलेल्या कामांची यादी ऑफीस रिपोर्टात चे फाईल मध्ये आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- सदर निविदा धारकांचे मुख्य कार्यालयास भेट देउन त्यांनी पूर्ण केलेल्या, राबविलेल्या योजनांची पहाणी केल्या नंतर निर्णय घ्यावा.

मा.श्री.जोशी अ.सु.:-मा.स्थायी समिती सदस्य मा.श्री.बोरूडे व श्री तिवारी साहेब यांनी सदरची पहाणी करावी

मा.श्री.बोरूडे अ.व. :- मा.श्री. घुले साहेबांना ही बरोबर घ्यावे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- सदर फर्मचा व कामाचा अनुभव पाहून कमीचे दर मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त साहेबांना द्यावे.

मा.श्री.जोशी अ.सु. :- त्या प्रमाणे मंजूरी द्यावी.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार कमीचे निविदादर धारक तरे ॲन्ड असो. सातपुर नाशिक यांचे कामाचा अनुभव पाहून छाननी समितीने शिफारस केलेल्या कमीचे दरास मंजूरी देणे विषयी चे अधिकार मा.आयुक्त साहेबांना देण्यांत यावे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दी मधील झोपडपट्टया मध्ये एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (I.H.S.D.P.) राबविणे कामी आर्किटेक्ट / कंन्सलटंन्ट नेमणे करीता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्टावर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक तरे ॲन्ड असो. सातपुर, नाशिक यांचे कामाचा अनुभव पाहून छाननी समितीने शिफारस केलेल्या कमीचे दरास मंजूरी देणे विषयी चे अधिकार मा.आयुक्त साहेब अहमदनगर महानगरपालिका यांना देण्यांत येत आहे.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी

सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.

अनुमोदक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-५**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-३ मंगळवार दिनांक : २६/६/२००७

ठराव क्रमांक -३ मंगळवार दिनांक : २६/६/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणच्या पाणी पुरवठा योजने करिता जीवन प्राधिकरणाच्या दर करार असलेल्या पुरवठादार संस्थे कडून २०० एम.एम.व्यासाचे ५३७५ रनिंग मिटर के.९डी.आय.क्लास पाईप खरेदी विषयी ऑफीस रिपोर्ट माहितीस्तव व फेर अवलोकनार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, अ.नगर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी पाणी पुरवठा योजनेकरीता लागणारे सी.आय. / डी.आय पाईप महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या दर करार असलेल्या पुरवठादार संस्थेकडून खरेदी करणेबाबत दि.१३/२/०७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावामध्ये खालील ठिकाणी २०० एम.एम.व्यासाचे K-९D.I. Class चे पाईप एकूण ५३७५ मी. पाईपचा समावेश होता.

७]केडगाव अतंर्गत इंडस्ट्रीयलइस्टेट ते बालाजी संपवेलपर्यत२००एम.एम,व्यासाचे डी.आय.के-९पाईप टाकणे
८]केडगांव अंतर्गत बालाजी संपवेल ते एकनाथनगरपर्यत २०० एम.एम,व्यासाचे डी.आय.के-९ पाईप टाकणे
९]नगर-पुणे हायवेलगत सक्कर चौक ते होले शो-रूम पर्यत२००एम.एम,व्यासाचे डी.आय.के-९ पाईप टाकणे

या तिन्ही कामांची उचित मान्यता घेवून निविदा प्रक्रीया पार पाडण्याट आली होती, त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | प्राप्त किमान निविदा दर | म.जि.प्रा. च्या दरकरारानुसार खरेदी केल्यास होणारी बचत |
|---|---|---|---|---|
| १ | केडगाव अतंर्गत इंडस्ट्रीयल इस्टेट ते बालाजी संपवेल पर्यत २०० एम.एम,व्यासाचे डी.आय.के-९ पाईप टाकणे | रू.३४,९३,५१४/- | निविदा दरापेक्षा ४१.२५% जास्त | रू.१८,८९,९१५/- |
| २ | केडगाव अतंर्गत बालाजी संपवेल ते एकनाथनगर पर्यत २००एम.एम,व्यासाचे डी.आय.के-९ पाईप टाकणे | रू.३२,३६,३७४/- | निविदा दरापेक्षा ४१% जास्त | रू.१७,०५,२१३/- |
| ३ | नगर-पुणेहायवेलगत सक्कर चौक ते होले शे-रूमपर्यत २००एम.एम,व्यासाचे डी.आय.के-९ पाईप टाकणे | रू.८,५७,६६७/- | निविदा दरापेक्षा ३२.२५% जास्त | रू.५,१७,२८१/- |

वरील बाबींचा विचार करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंजुर दर करारानुसार वरील तीनही कामांकरिता एकुण ५३७५ मीटर पाईप करीता रू.६१,८१,२५०/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यतेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास मा.आयुक्त, यांनी दि.१३/२/०७ रोजी मान्यता मिळाली.

तद्नंतर दि.१४/२/०७ रोजी वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी पाणी पुरवठा योजनेकरिता लागणारे सी.आय./ डी.आय. पाईप म.जि.प्रा.कडील दरकरार असलेल्या पुरवठादारामार्फत खरेदी करणे बाबत प्रस्ताव दि.१४/०२/०७ रोजी. मा.आयुक्त यांचेकडे सादर करण्यात आला सदर प्रस्तावास दि.१५/२/०७ रोजी मा.आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झाली व प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आला.

सदर प्रस्तावाबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.१ दि.१७/२/०७ अन्वये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

"अहमदनगर महानगरपालिकेस विविध ठिकाणच्या पाणी पुरवठा योजना / कामे करिता लागणा-या निरनिराळया प्रकारचे C.I./D.I. इ. I.S.I. मार्क कंपनीचे पाईप खरेदी कामी शॅार्ट नोटीसने निविदा मागविण्यात याव्यात.

मागविण्यात आलेल्या जाहीर निविदा दर हे म.जि.प्रा.यांचा दर करार असलेल्या पुरवठादार संस्थेच्या दरापेक्षा जास्त आल्यास एस्टीमेट मंजूर असलेल्या कामाकरिता म.जि.प्रा.च्या दरकरार असलेल्या पुरवठादार संसथेकडून पाईप खरेदी करणे विषयी प्रस्ताव मंजूरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सादर करण्यात यावा.

अ.नगर महानगरपालिकेच्या कामांसाठी आवश्यक असणारे सी.आय / डी.आय इ. पाईप खरेदीस मा.स्थायी समितीची मंजुरी घेवून नंतरच पुढील कार्यवाही करण्यात यावी "

तद्नंतर पाईप खरेदीबाबतच्या प्रसतावास दि. २०/२/०७ च्या अंदाजपत्रका च्या सभेत मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२ नुसार खालीलप्रमाणे ठरावपारीत करण्यात आला.

" सन०६/०७ या आर्थिक वर्षामध्ये मोठया प्रमाणात पाणी पुरवठा पाईप लाईनच्या कामाच्या निविदा काढण्यात आल्या,परंतु निविदाधारकांनी ३० % ते ५०% जादाच्या गैरवाजवी निविदा भरण्यात आल्या पुनश्च या बाबींची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता ही सभा म.जि.प्रा. यांचेकडील दरकरारानुसार म.न.पा.च्या कामासाठी पाईपची खरेदी करणेबाबत मा. आयुक्त अ.नगर म.न.पा. यांना प्राधिकृत करीत आहे. मा.आयुक्त,अ.नगर मनपा यांनी उन्हाळयाचे दिवस व पाण्याच्या अभावामुळे नागरिकांची होणारी गैरसोयीचा प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी या व पुढील आर्थिक वर्षासह दाखल होणा-या प्रस्तावाबाबत सदरची कार्यवाही करण्याचे अधिकार ही सभा देत आहे.

त्यानुसार केडगाव व नगर-पुणे हायवेलगत माणिकनगर,विनायकनगर वसाहतीकरिता आवश्यक असणारे पाईप म.जि.प्रा. च्या दरकरार असलेल्या एजन्सीकडून खरेदी करण्यात आले.

या पुर्वी C.I. पाईप जलवाहीन्या टाकणे पाणी पुरवठया सारखी अति महत्वाची बाब विचारात घेवुन म.न.पा.ने निविदा मागविली असता निविदा दरापेक्षा ३० ते ४० टक्के जादा दराच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. म.जि.प्रा. ने मोठया प्रमाणात जाहीरात देवून पाईप खरेदीबाबत पुरवठादाराच्या निविदा मागविल्या होत्या व त्यानुसार संपुर्ण राज्याची विविध भागातील मागणीचा विचार करून व मोठया प्रमाणात ऑर्डर असल्यामुळे त्यांनी निविदेमध्ये दर नमुद केलेले आहेत व सदरील दर हे अत्यंत वाजवी आहेत.

दिनांक २०/२/२००७ चा ठराव व दि. २७/४/२००७ च्या सभेतील चर्चा व पाणी पुरवठया सारखी अतिमहत्वाची बाब विचारात घेवुन पुन्हा खालील कामांसाठी त्यासमोर नमुद केलेल्याप्रमाणे पाईपची मागणी दर करारानुसार करण्यात आलेली आहे.

| अ.नं | कामाचे नाव | मागविलेले पाईप संख्या (रनिंग मी.मध्ये ) |
|---|---|---|
| १ | केडगाव अतंर्गत इंडस्ट्रीयल इस्टेट ते बालाजी संपवेल पर्यत २०० एम.एम,व्यासाचे डी.आय.के-९ पाईप टाकणे | २५०३ |
| २ | केडगाव अतंर्गत बालाजी संपवेल ते एकनाथनगर पर्यत २०० एम.एम,व्यासाचे डी.आय.के-९ पाईप टाकणे | २३२४ |
| ३ | नगर-पुणेहायवेलगत सक्कर चौक ते होले शो-रूमपर्यत २००एम.एम,व्यासाचे डी.आय.के-९ पाईप टाकणे | ५४८ |
| | | एकूण ५३७५.०० र.मी. |

तरी माहितीस्तव मा.स्थायी समितीस सादर करणे उचित राहील. आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री.सोनटक्के व्ही.जी. यांचा अहवाल फेर सादर असे दि.२४/५/०७

मा.शहरअभियंता श्री.एन.बी.मगर**:-शाखा अभियंता यांचे अहवालाप्रमाणे मा.स्थायी समिति कडे माहितीस्तव व फेर अवलोकनार्थ प्रस्ताव पाठविणे योग्य वाटते.दि.२४/५/०७**

मा.उपायुक्त साहेब (सा) :- **'अ'** प्रमाणे मान्यतेस सादर. दि.२५/५/०७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही . दिनांक २५/५/२००७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.त्रिपाठी सु.च.व मा.श्री.जोशी अ.सु. :- मा.आयुक्त साहेबांना सभे मध्ये बोलावण्यात यावे. तसेच पत्रकार व व म.न.पा.चे विधी सल्लागार यांनाही सभेत बोलावण्यांत यावे.

त्या प्रमाणे म.न.पा.चे विधी सल्लागार सौ.स्वाती नगरकर या सभेमध्ये हजर झाल्या

मा.श्री.तिवारी सु.र.:- सदरचे पाईप खरेदी प्रकरणी आपला कायदेविषयक अभिप्राय मा.स्थायी समितीस देणे बाबत मा.सभापती साहेबांनी आपणांस पत्र दिलेले होते.

म.न.पा. विधिज्ञ सौ.स्वाती नगरकर :- सदरचे पत्र मला दिनांक २०/५/२००६ रोजी मिळलेले असून सदर प्रकरणी मा.महासभे मध्ये झालेल्या चर्चे ची माहिती मी घेतली असून म.न.पा. अधिनियम पाहून मी अभिप्राय सभे पुढे सादर करील.

मा.श्री. जोशी अ.सु. :- तो पर्यत आम्ही सदर विषय तहकुब ठेवावा का?

म.न.पा.विधिज्ञ सौ.स्वाती नगरकर :- मी उद्या माझा अभिप्राय सभेपुढे सादर करील तो पर्यत सदर विषय तहकुब ठेवावा.

मा.श्री.शेख मुदस्सर अ.इ.:- सदर प्रस्ताव तहकुब ठेउ नका. त्यास आमचा विरोध आहे. पाईप लाईनची कामे होणे आवश्यक आहे. विषय तहकुब ठेउ नका त्यावर मतदान घेण्यात यावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- अवलोकनार्थ म्हणजे काय ?

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- मा.आयुक्त साहेबांना जनरल बोर्डाचे मंजूरीने दिलेल्या अधिकारा प्रमाणे मा.आयुक्त साहेबांनी कार्यवाही केले बाबतचा अहवाल माहितीसाठी मा.स्थायी समितीपुढे सादर केलेला आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- अवलोकनार्थ या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ हा माहिती घेणे,निरिक्षण करणे व परत पाठविणे असा आहे.

मा.श्री.जोशी अ.सु. :- हा अहवाल मा.स्थायी समितीपुढे सादर करणे आवश्यक नव्हते तो सर्व सदस्यांना तसाच पाठविला असता तरी चालले असते.

मा.श्री.त्रिपाठी सु.च.:- सदर पाईप लाईनचे कामासाठी आपण सी आय.जी.आय. पाईप च्या की डी.आय. पाईपच्या निविदा मागविल्या होत्या

शहर अभियंता श्री.मगर एन.बी. :- आपण सी.आय.पाईपच्या निविदा मागविल्या होत्या.

मा.श्री. त्रिपाठी सु.च.:- डी आय पाईपच्या निविदा का मागविल्या नाहीत. डी आय पाईप बाबत जिवन प्राधिकरणासी करार झालेला नाही.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- आपण अद्याप पर्यत डी.आय. पाईप वापरलेले नाहीत.

मा.श्री.घुले अ.ह.व मा.श्री. तिवारी सु.र.:- वकीलाचे मत आल्या नंतर निर्णय घ्यावा.ती. पर्यत तहकुब ठेवावा.

मा.श्री.जोशी अ.सु. :- तो पर्यत विषय तहकुब ठेवावा.

मा.श्री.शेख मुदस्सर अ.इ. :- तहकुब ठेवणेस आमचा विरोध आहे.

मा.श्री.घुले अ.ह. :- स्थायी समितीचा पाईप खरेदीस विरोध नाही. आणि कुनी विरोध ही केलेला नव्हता.

मा.श्री. त्रिपाठी सु.च.:- पाईप खरेदी बाबत प्रशासनाने चुकीची कार्यवाही केलेली आहे.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- सदर प्रकरणी आत्ताच निर्णय घ्यावा

मा.श्री. बारस्कर पो.ज, मा.श्री . त्रिपाठी सु.च. व मा.श्री. तिवारी सु.र. :- मा.स्थायी समितीचा ठराव डावलून प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे. त्यास आमचा विरोध आहे. पाईप खरेदीस आमचा विरोध नाही.

मा.श्री.जोशी अ.सु. :- स्थायी समिती मोठी की महासभा

मुख्य लेखा परिक्षक श्री. कदम अ.ए. :- आर्थिक अधिकार स्थायी समितीस आहेत.

सहाय्यक आयुक्त मा.श्री. देशमुख साहेब :- मा.महासभा सर्वोच्च मोठी असून महासभेचे ठरावाप्रमाणे केलेल्या कार्यवाही विषयी अहवाल सभेपुढे सादर केलेला आहे.त्यास मंजूरी देणे अगर नामंजूर करणेचा प्रश्न नाही प्रस्ताव माहिती साठी सभे पुढे सादर केलेला आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.च .:- कायदेशीर मत येईपर्यत तहकुब ठेवावा.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार सर्वानुमते सदर प्रकरणी महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांचे मता सह सदर प्रस्ताव सभेपुढे सादर करण्यांत यावा. तो पर्यत सदर प्रस्ताव तहकुब ठेवणेत यावा.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणाच्या पाणी पुरवठा योजने करीता जिवन प्राधिकरणाच्या दर करार असलेल्या पुरवठा दार संस्थे कडून २०० एम.एम. व्यासाचे ५३७५ रनिंग मिटर के.९ डी आय क्लास पाईप खरेदी विषयी माहिती साठी व फेर अवलोकनार्थ सादर केलेल्या प्रस्तावावर सभे मध्ये झालेल्या चर्चे नुसार सदर प्रकरणी महानगरपालिके चे विधि सल्लागार यांचे मत मागविण्यांत आलेले असल्याने, विधी सल्लागार यांचे मता सह सदर प्रस्ताव सभे पुढे सादर करण्यांत यावा तो पर्यत सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. त्रिपाठी .सु.च.
अनुमोदक :- मा.श्री. घुले अ.ह.
ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-५**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-४ मंगळवार दिनांक : २६/६/२००७

ठराव क्रमांक-४ मंगळवार दिनांक : २६/६/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महालक्ष्मी उद्यान खाजगी तत्वावर (बी.ओ.टी.) वार्षिक कराराने तीन वर्षाकरिता चालविणेस देणे बाबत मंजूरी मिळणे विषयी ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महालक्ष्मी उद्यान खाजगी संस्थेस " बांधा वापरा, हस्तांतरण करा " या तत्वावर वार्षिक कराराने देणेबाबत.

टिप्पणी सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचे सावेडी येथील महालक्ष्मी उद्यान हे दि.१२-३-२००६ रोजी नागरिक व मुलांसाठी खुले करण्यात आलेले असुन सर्व नगरवासियांकरीता उद्यानाचा उपभोग घेणेचे दृष्टीने महानगरपालिके मार्फत उद्यानामध्ये येणारे मुले व नागरिकांसाठी प्रवेश फी आकारणेचा निर्णय घेणेत आला असुन तीन वर्षापर्यंतचे लहान मुलांसाठी मोफत प्रवेश ,३ ते १२ वर्षापर्यंतचे मुलांना १ रू.प्रवेश फी व १२ वर्षानंतरचे मुले व नागरिकांसाठी २ रू. प्रवेश फी आकारणेचा निर्णय झालेला असुन प्रवेश फी पासुनचे दरमहा उत्पन्न पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | प्रवेश फी दर | माहे | एकुण | दरमहा एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | रू.१ प्रमाणे | १ एप्रिल ३१ | १९,०३४=०० | ५७,१०० /- |
| | रू.२ प्रमाणे | | ३७,९६६=०० | |
| २ | रू.१ प्रमाणे | मे १ ते ३० अखेर | १३,६६६=०० | ४१,२०० /- |
| | रू.२ प्रमाणे | | २७,३३४=०० | |
| ३ | रू.१ प्रमाणे | जुन | ४,८००=०० | १४,४०० /- |
| | रू.२ प्रमाणे | | ९,६००=०० | |
| ४ | रू.१ प्रमाणे | जुलै | ३,४६७=०० | १४,४०० /- |
| | रू.२ प्रमाणे | | ६,९३३=०० | |
| ५ | रू.१ प्रमाणे | ऑगस्ट | ३,०८६=०० | ९,२६० /- |
| | रू.२ प्रमाणे | | ६,९३३=०० | |
| ६ | रू.१ प्रमाणे | सप्टेंबर | १,०५६=०० | ३,१७० /- |
| | रू.२ प्रमाणे | | २,११४=०० | |
| ७ | रू.१ प्रमाणे | ऑक्टोंबर | २,४४६=०० | ७,३४० /- |
| | रू.२ प्रमाणे | | ४,८९४=०० | |
| ८ | रू.१ प्रमाणे | नोव्हेंबर | २,५६६=०० | ७,७०० /- |
| | रू.२ प्रमाणे | | ५,१३४=०० | |
| ९ | रू.१ प्रमाणे | डिसेंबर | ३,३००=०० | ९,९०० /- |
| | रू.२ प्रमाणे | | ६,६००=०० | |
| १० | माहे एप्रिल ते डिसेंबर २००६ | | एकुण रूपये | १,६०,४७० /- |

याप्रमाणे महानगरपालिकेस सन २००६-२००७ मध्ये दिनांक १-४-०६ ते  ३१-१२-०६ अखेर रुपये १,६०,४७०/- उत्पन्न आले आहे.

तसेच महालक्ष्मी उद्यानाकरीता असलेल्या कर्मचारी यांचेवर अहमदनगर महानगरपालिकेचा दरमहा आस्थापना खर्च रुपये ६६,३४८/- इतका येत असून १ एप्रील ते ३१ डिसेंबर अखेर एकूण रुपये ५,९७,१३२/- एवढा खर्च आलेला आहे.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नांव | पदनाम | दरमहा वेतन | १ एप्रील ते ३१ डिसेंबर अखेरचा खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.केरु मनाजी शिंदे | माळी | ९,००० /- | ८१,००० /- |
| २ | श्री.अनिल रामचंद्र जाधव | प्रवेश फी क्लार्क | ९,००० /- | ८१,००० /- |
| ३ | श्री.बाळासाहेब सोनवणे | बिगारी | ६,००० /- | ५४,००० /- |
| ४ | श्री.विष्णू सखाराम येमुल | बिगारी रात्रपाळी वॉचमन | ६,००० /- | ५४,५०० /- |
| ५ | श्री.शिवराम पांडूरंग गावंडे | बिगारी | ५,५०० /- | ४९,५०० /- |
| ६ | श्री.अंबादास सुरम | रात्रपाळी वॉचमन | ६,८०० /- | ६१,२०० /- |
| ७ | श्री.उल्हास शंकर नवगीरे | रात्रपाळी वॉचमन | ६,००० /- | ५४,००० /- |
| ८ | श्री.गणेश धाडगे | प्रवेश फी क्लार्क मदतनीस | ६,००० /- | ५४,००० /- |
| ९ | श्री.महेंद्र रामचंद्र जाधोर | बिगारी | ६,००० /- | ५४,००० /- |
| १० | श्री.प्रकार इवळे | बिगारी | ६,०४८ /- | ५४,४३२ /- |
| १ ते १० | १ एप्रिल ते ३१ डिसेंबर अखेरचा खर्च | | | ५,९७,१३२ /- |

येणे प्रमाणे आस्थापना खर्च दरमहा रू.६६३४८/- प्रमाणे वर्षाचा खर्च रू.७,९६,१७६/- एवढा आसुन विदयुत बिलाचा खर्च रू.४,५००/- दरमहा प्रमाणे वार्षिक खर्च रू.५४,०००/- येत आसुन महालक्ष्मी उदयानासाठी एकूण वार्षिक खर्च रू.८,५०,१७६/- येत आहे.

तरी महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाचा विचार करता महालक्ष्मी उद्यान आहे या पेक्षा चांगले होण्यासाठी व मच्छालय घर चालू करनेसाठी  म.न.पा.कडे कुशल कामगार नाही व कुशल माळी नाही.तरी सध्याचे दरमहा प्रवेश फी द्वारे मिळणारे उत्पन्न हे रूपये ( रूपये १७,८३०-०० ) सतरा हजार आठशे तीस येवढे आसून एकूण वार्षिक उत्पन्न रू.१७,८३०=००x१२ महिने प्रमाणे रू.२,१३,९६०/- दरमहा होणारा तोटा रू.४९,५१८/- होत आहे. तरी दरमहा होणारे नुकसान टाळणे व नागरिकांना बाग सुधारणेसह चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध करणेसाठी.  महालक्ष्मी उद्यान / हे खाजगी संस्था/ ठेकेदारास आवश्यकते नुसार कार्यवाही करणेचे दृष्टीने  बी.ओ.टी. वर वार्षिक कराराने ३ वर्षाकरिता देणेकरिता आवश्यकते नुसार कार्यवाही करणेचे दृष्टीने पुढील आदेशार्थ सादर,

येणे प्रमाणे उदयान विभाग प्रमुख श्री. गोयल के.ए. यांचा अहवाल असे दि.१६/५/०७

उपशहर अभियंता :-उदयान प्रमुख व शाखा अभियंता यांच्या प्रस्तावानुसार बी.ओ.टी. वर देणे योग्य वाटते तरी आदेशार्थ सादर, दि.१७/५/०७

शहर अभियंता श्री.मगर एन.बी. :-अहवालाप्रमाणे महालक्ष्मी उदयान खाजगी तत्वावर (B.O.T) चालविण्यास देणे योग्य वाटते.सदरबाबत मा.स्थायी समितीची मंजुरी घेउन पुढील कार्यवाही करणे योग्य वाटते निर्णयास्तव सादर. दि.१९/५/०७

अं.लेखा परिक्षक :- सादर, शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे मा.स्थायी समितीची मान्यता घेणेस हरकत नाही.दि.१९/५/०७

मा.उपायुक्त साहेब (कर):- प्रस्ताव मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य राहिल मान्यतेस्तव सादर

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२८/५/०७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सदर प्रकरणाची माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- सदरचे महालक्ष्मी उद्यान खाजगी तत्वावर बी.ओ.टी. वर वार्षिक कराराने तीन वर्षा करिता चालविणेस देणे कामी मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सभे पुढे सादर केलेला आहे.

मा.श्री.त्रिपाठी सु.च. :- सदर बाग बी.ओ.टी. वर चालविणेस देण्याचे ठेक्याची मुदत पांच वर्षाची ठेवावी. ठेकेदाराकडून अनामत म्हणून रूपये एक लाख घेण्यांत यावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- बागेचे मेन्टेनन्सचा अनुभव असलेल्या व्यक्तिस / संस्थेसच ठेका देण्यात याव त्याचे कडून सुरक्षा ठेव म्हणून रूपये एक लाख घेण्यात यावे. अशा अटी टाकाव्यात ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.त्रिपाठी सु.च. :- ठेकेदाराने बागेत नेमलेल्या कर्मचा-यांची माहिती म.न.पास द्यावी.

मा.श्री.बोरूडे अ.व.:-सदर बागेत मच्छालय बांधून ते चालू करणेबाबतची अट कंपलसरी टाकण्यात यावी.ठेकेदाराने सध्या आकरणी करण्यात येणारे तिकीटाचे दर पांच वर्षासाठी कायम ठेवण्यांत यावे. दर वाढ करू नये ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ.काळे गि.सु. :- मोफत प्रवेश ठेवल्यास नागरिकांना बागेचे महत्व कळणार नाही. तीची व्यवस्था चांगली राहिला.

मा.सभापती साहेब :- बागे मध्ये ठेकेदारा मार्फत होणारी डेव्हलपमॅट तसेच बसविलेली खेळणी साहित्याची मालकी ठेका मुदत संपले नंतर म.न.पा.चे मालकीची होईल. ठेके दारा कडून अनामत म्हणून एक लाख रूपये घेण्यांत यावे ठेक्याची मुदत पांच वर्षासाठी असावी. जेष्ठ नागरिकांना बागे मध्ये प्रवेश मोफत करावा. बागेत ठेकेदाराने मच्छालय सुरू करावे. ठेकेदाराने नेमलेल्या कर्मचा-यांची सविस्तर माहिती म.न.पास द्यावी या अटीं चा समोवश करून महालक्ष्मी गार्डन वार्षिक करारानले बी.ओ.टी. तत्वावर चालविण्यास देणेस सर्वानुमते मंजूरी द्यावी.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महालक्ष्मी उद्यान खाजगी तत्वावर (बी.ओ.टी.) वार्षिक कराराने तीन वर्षाकरिता चालविणेस देणे बाबत मंजूरी मिळणे विषयी ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महालक्ष्मी उद्यान खाजगी तत्वावर (बी.ओ.टी.) वार्षिक कराराने तीन वर्षा करिता चालविणेस देणे बाबत मंजूरी मिळणे विषयी कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभे मध्ये झालेल्या चर्चे नुसार खालील अटीचा समावेश करून महालक्ष्मी उदयान खाजगी तत्वावर (बी.ओ.टी.) चालविणेस देणेस मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफीस रिपोर्ट मंजूर

१] बागेच्या ठेक्याची मुदत तीन वर्षा ऐवजी पांच वर्षे अशी करण्यात यावी.

२] पुर्वानुभव असलेल्या विकासकासच ठेका देण्यांत यावा व त्याचे कडून सुरक्षा अनामत ठेव म्हणून रूपये एक लाख फक्त घेण्यांत यावे.

३] ठेकेदराने बागेत नेमलेल्या कर्मचा-याची माहिती म.न.पास देण्यांत यावी.

४] सदर बागे मध्ये मच्छालयाची इमारत बांधून ते चालू करण्यांत यावे व सदर बागे करिता सध्या अकारण्यांत येणारे तिकीट दशमध्ये पांच वर्षा पर्यत कुठल्याही प्रकराची वाढ करण्यांत येउ नये तसेच जेष्ठ नागरिकांकडून प्रवेश फी आकारणेत येउ नये

५] ठेकेदाराने स्वखर्चाने बागेत मध्ये केलेली विकासाची कामे, बसविलेल्या खेळण्या साहित्य इत्यादीची मालकी ठेक्याची मुदत संपल्या नंतर महानगरपालिकेची राहिल त्या वर ठेकेदारास कुठल्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. बोरूडे अ.व .

अनुमोदक :- मा.श्री. जोशी अ.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक -५ मंगळवार दिनांक : २६/६/२००७

ठराव क्रमांक -५ मंगळवार दिनांक : २६/६/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेस नगर-मनमाड व नगर-औरंगाबाद रोड वरील विद्यमान जकात नाक्याचे मागील नागापूर सर्व्हे नं.२४ पै. व पोखर्डी सर्व्हे नं.१६७ पै. प्रतेंकी ०.८० हेक्टर मोकळया जागा अनुक्रमे दरमहा भाडे रू.४०,०००/- व रूपये १५,०००/- प्रमाणे वाहन तळासाठी नगर-पुणे रोड वरील विद्यमान जकात नाक्या मागील जागे सह भाडे तत्वावर घेण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सध्या विद्यमान जकात नाक्यावर अवजड वहाने जकाती साठी थांबतात राज्य महामार्गावर वाहतुकीचा खोळंबा होतो ही वस्तुस्थीती विचारात घेउन व मा.आयुक्त साहेब व मा. उपायुक्त (कर ) यांनी या राज्य महामार्गा वरील जकात नाक्या जवळ मोकळया जागा शोधून या जागा भाडेपट्टया ने मिळविण्याचा प्रयत्न करावा अशा सुचना केल्या होत्या या बाबतची कार्यवाही सुरू असतांनाच दि.९/४/२००७ रोजी या वाहतुक समस्ये बाबत नगर-मनमाड रोड येथे रस्ता रोको आंदोलन करण्यांत आले या वेळी मा.उपायुक्त (कर) यांनी या मोकळया जागा तातडीने पहाण्याच्या सुचना दिल्या त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील प्रमाणे देत आहे.

मा.आयुक्त व मा.उपायुक्त (कर) यांच्या दि.९/४/२००७ च्या सुचने प्रमाणे नगररचनाकार कनिष्ठ अभियंता श्री. बल्लाळ ,श्री. डवरे एम.एल. प्रभारी जकात अधिक्षक व श्री. साबळे यांनी खालील जागांची संयुक्तीक पहाणी केली.

१] नगर-मनमाड रस्तावरील विद्यमान जकात नाक्या मागील उत्तरेस स.नं.२४ पैकी जागा (क्षेत्र ०.८० हेक्टर )

२] नगर-औरंगाबाद महामार्गा वरील विद्यमाने जकात नाक्या मागे स.नं. १६८ पैकी जागा (क्षेत्र ०.८० हेक्टर)

उपरोक्त दोन्ही जागा जकात नाक्याच्या वाहनतळा साठी योग्य आहेत. या जागेची समक्ष पहाणी केल्या नंतर या जागेच्या मालकांशी संपर्क करण्यांत आला या जमीन मालकांना वस्तुस्थीती सांगितल्या नंतर त्यांनी या जागा योग्य भाडे मिळाल्यास महानगरपालिकेस भाडे पट्टयाने देण्याची तयारी दर्शविली आहे. तसे लेखी पत्रही या दोन्ही जमीन मालकांनी सादर केलेले आहे. भाडेपट्टा ठराविण्यासाठी चर्चा करण्यासाठी या जमिन मालकांनी मा.आयुक्त यांची वेळ मागितली आहे.तरी ही चर्चा करण्यासाठी योग्य ती वेळ तारीख मिळावी ही विनंती याची पुर्व तयारी म्हणून या जागेचा भाडे पट्टा खालील प्रमाणे ठरविण्यांत येत आहे.

१] पोखर्डी स.नं. १६८ क्षेत्र (०.८० हेक्टर)

सदर जागेचा दर रू.५००/- प्रती चौ.मी.इतका गृहित धरून या दरास क्षेत्रासाठी खालील प्रमाणे वजावट होणे आवश्यक असते.

पहिल्या ४००० चौ.मी साठी ८० % दर

५००X४०००X०.८०=१६,००,०००/- व उर्वरित ४००० चौ.मी. साठी ६० % दर ५००X४०००X०.६०=१२,००,०००/-

एकूण १६,००,०००/- +१२,००,०००/- = २८,००,०००/-

भाडे पट्टयासाठी या जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८ % इतके वार्षिक उत्पन्न गृहित धरल्यास या जमिनीचे वार्षिक भाडे मुल्य रू. २,२४,०००/- इतके होईल. त्यामुळे हया जागेस रू.१८,६६६/- प्रती माह इतका मासिक भाडे दर येतो. सबब त्या जागेस रू. १८,०००/- इतके भाडे देणे योग्य होईल.

२] नागापुर स.नं.२४ (क्षेत्र ०.८० हेक्टर)

शिघ्रप्रसिध्द गणकाचा दर रू.११००/- प्रती चौ.मी. या दरास क्षेत्रासाठी खालील वजावट होणे आवश्यक आहे.

पहिल्या ४००० चौ.मी. साठी ८ % दर

११००X४०००X०.८० = ३५,२०,०००/-व उर्वरित ४० चौ.मी. साठी ६०% दर

११००X४०००X ०.६०= २६,४०,०००/-

एकूण ३५,२०,०००/- + २६,४०,०००/- =६१,६०,०००/-

भाडे पट्टया साठी ही बिनशेती जमीन असल्याने एकूण किंमतीच्या ८% इतके वार्षिक उत्पन्न गृहित धरल्यास या जमिनीचे वार्षिक भाडे मुल्य रू.४,९२,८००/- इतके होईल. त्यामुळे या जागेचा दर रूपये ४१,०६६/-प्रती माह इतका होतो सबब सदर जागा रू.४१,०००/- महिना या दराने भाडयाने घेणे योग्य होईल.

उपरोक्त भाडे मुल्य दरात मा.आयुक्त यांनी १५% कपात किंवा वाढ केल्यास ते नियमानुसार संयुक्तीक ठरेल असे मत आहे.तसेच केडगांव येथील महामार्गा वरील जागेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे या पुर्वीच सादर केलेला आहे.

येणे प्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे दि.१३/४/०७

मा.उपायुक्त (कर) यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे नगररचनाकार यांनी दिनांक १६/४/२००७ रोजी पोखर्डी स.नं.१६८ चे जमिन मालक श्री.अंकुश नरसिंग भिंगारे व नागापुर स.नं.२४ चे जमिन मालक श्री. पटेल देवेंद्र बाबुलाल यांना चर्चे साठी पाचारण करण्यांत आले.

मा.उपायुक्त (कर) यांनी संबंधीतांशी प्रत्यक्ष चर्चा केली व त्यांच्या जागा संबंधीताच्या भाडयाच्या अपेक्षा विचारल्या तेव्हा श्री. देवेंद्र पटेल यांनी किमान ६०,०००/- रूपये भाडे व श्री.अंकुश भिंगारे यांनी किमान रूपये २५,०००/- प्रती महिन्या इतक्या भाडयाची अपेक्षा व्यक्त केली त्यावर ते भाडे फार जास्त होत असल्याचे मत व्यक्त करून मा.उपायुक्त (कर) यांनी हे भाडे कमी करण्याची विनंती जमीन मालकांनी केली त्यावर हया भाडया पेक्षा थोडे फार कमी भाडे स्विकारण्याचाी तयारी जमीन मालकांनी दर्शविली त्याबाबत सविस्तर चर्चा करून अखेरीस सदर जमीन मालकांनी खालील प्रमाणे अपेक्षा व्यक्त केली आहे.

१] श्री.अंकुश भिंगारे -पोखर्डी स.नं. १६८ चे रू.१५,०००/- भाडे प्रती महिना

२] श्री. देवेंद्र पटेल -नागापुर स.नं.२४ चे रू.४०,०००/- भाडे प्रती महिना

अहमदनगर महानगरपालिकेस असलेली जागेची निकड व जमिनीचे होणारे मुल्यांकन इत्यादीचा विचार करता उपरोक्त अर्जदारांची मागणी मंजूर करण्यांस हरकत नाही. सबब सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविणे योग्य होईल.

येणे प्रमाणे नगररचनाकार साहेब यांचा अहवाल फेरसादर असे.

मा.उपायुक्त साहेब (कर) :- प्रस्ताव मंजूरी साठी मा.स्थायी समितीकडे पाठविणे योग्य राहिल मान्यतेस्तव सादर. दि.२४/४/२००७

मा.आयुक्त साहेब :- सदर ठिकाणांचा शासकीय दर काय आहे.? व सादर केलेले दर शासकीय दरापेक्षा किती कमी / जास्त आहेत खुलासा करावा दि.२८/४/२००७

फेर सादर,

उपरोक्त भाडे ठरविण्यासाठी वापरलेले दर हे शासनाच्या शिघ्रप्रसिध्द गणका प्रमाणे ठरविलेले दर आहेत.

१] नागापुर स.नं.२४ या जमिनीचा सर्व्हे क्रमांकानुसारच दर शिघ्रप्रसिध्द गणकात उपलभ्द आहे. (हा दर रूपये १,१००/- प्रती चौ.मी.इतका आहे.)

२] पोखर्डी स.नं.१६८ या जागेचा सर्व्हे क्रमांकाप्रमाणे दर उपलभ्द नाही तथापी या जमिनीच्या अली कडील महानगरपालिकेच्या हद्दीतील जमिनीचा दर रूपये १००० ते २४०० रूपये प्रती चौ.मी पर्यत आहे.

तर पोखर्डी भागातील बिनशेती जमिनीचा दर रूपये २३.५ इतका प्रती चौ.मी. आहे हे दोन्ही दर विचारात घेउन रूपये ५०० प्रती चौ.मी. किमान दर भाडे ठरविण्यासाठी उपयोगात आणलेला आहे.आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे नगररचनाकार साहेब यांचा अहवाल फेर सादर असे. दि.९/५/२००७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देणेत येतो की, नगर-औरंगाबाद व नगर-मनमाड महामार्गा वरील महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जकात नाके आहेत. सदर दोन्ही नाक्यावर जकाती साठी मोठया प्रमाणात वहाने रस्त्यावर थांबतात त्यामुळे सदर ठिकाणी वाहतुकीची मोठी कोंडी होते.

सदर बाबत मा.आयुक्त, उपायुक्त यांच्या सुचने प्रमाणे नगररचनाकार कनिष्ठ अभियंता श्री. बल्लाळ प्रभारी जकात अधिक्षक श्री.एम.एल.डवरे व श्री. साबळे यांनी समक्ष जागेची पहाणी केली आहे. त्यानुसार नगर-औरंगाबाद रस्त्या वरील जागा मालक श्री. नरसिंग बाबुराव भिंगारे यांचे जनरल मुखत्यार श्री. अंकुश नरसिंग भिंगारे व नगर-मनमाड रस्त्या वरील जागेचे मालक श्री.बाबुलाल पटेल यांना चर्चे साठी दि.९/४/०७ रोजी बोलावले होते.नगर औरंगाबाद रस्त्या वरील स.नं.१६८ व नगर-मनमाड रस्त्या वरील स.नं.२४ या जागा भाडे तत्वावर घेण्याचे प्रस्तावीत आहे.

नगरऔरगांबाद रस्त्या वरील स.नं.१६८ मधील ०.८० हेक्टर जमिन अकरा महिन्याच्या कराराने दर महा रूपये १५,०००/- भाडयाने व नगर मनमाड रस्त्या वरील स.नं.२४ ही जागा अकरा महिन्याच्या कराराने दर महा रू.४०,०००/- भाडयाने घेणे योग्य होईल.

तसेच नगर-पुणे रोड वरील जकात नाक्या मागील जागा भाडे तत्वावर घेण्याचा प्रस्ताव या पुर्वीच मा.स्थायी समिती कडे सादर केला असता मा.स्थायी समितीने सर्व नाक्याचे प्रस्ताव एकत्र सादर करण्याची सुचना दिल्याने त्या प्रमाणे एकत्रीत प्रस्ताव मान्यतेस सादर.

येणे प्रमाणे नगररचनाकार साहेब यांचा अहवाल असे. दि.१८/५/०७

मा.उपायुक्त साहेब (कर) :- प्रस्ताव मंजूरी साठी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे योगय राहिल. मान्यतेस्तव सादर दिनांक १९/५/२००७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषयः-**अहमदनगर महानगरपालिकेस नगर-मनमाड व नगर-औरंगाबाद रोड वरील विद्यमान जकात नाक्याचे मागील नागापूर सर्व्हे नं.२४ पै. व पोखर्डी सर्व्हे नं.१६७ पै. प्रतेंकी ०.८० हेक्टर मोकळया जागा अनुक्रमे दरमहा भाडे रू.४०,०००/- व रूपये १५,०००/- प्रमाणे वाहन तळासाठी नगर-पुणे रोड वरील विद्यमान जकात नाक्या मागील जागे सह भाडे तत्वावर घेण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सदरचे पोखडीं सर्व्हे नं.१६७ चे जागामालका पैकी काहीनी सदर जागा भाडयाने देण्यास हरकत असले बाबत माझे कडेस पत्र दिलेले आहे.

मा.श्री.त्रिपाठी सु.च.:- सदरचे वाहन तळासाठी ठरविलेल्या भाडयाच्या रकमा या जास्तीच्या आहेत. सदर ठिकाणच्या जमिनी भाडयाने न घेता खरेदी कराव्यात तसा प्रस्ताव प्रशासनाने तयार करावा.

मा.श्री. जोशी अ.सु. व मा.श्री. तिवारी सु.र. :- भाडे कमी करावे ते अवास्तव आहे.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- कायदेशिर मत घेउन पुढील कार्यवाही करण्यांस मंजूरी द्यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. व मा.श्री. तिवारी सु.र. :- भाडे कमी करून जागा भाडयाने घेण्यास मंजूरी द्यावी मा.आयुक्त साहेबांना त्या विषयी चे अधिकार द्यावेत

मा.सभापती साहेब :- सदर प्रकरणी ठरविलेले भाडे तडजोड करून कमी करून जागा भाडयाने घेणेचे अधिकार मा.आयुक्त साहेबांना देण्यांत यावेत. मा. आयुक्त साहेबांनी सदर प्रकरणी कायदेशिर बाजू पाहून पुढील योग्य ती कार्यवाही करावी ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेस नगर-मनमाड व नगर-औरंगाबाद रोड वरील विद्यमान जकात नाक्याचे मागील नागापूर सर्व्हे नं.२४ पै. व पोखर्डी सर्व्हे नं.१६७ पै. प्रतेंकी ०.८० हेक्टर मोकळया जागा अनुक्रमे दरमहा भाडे रू.४०,०००/- व रूपये १५,०००/- प्रमाणे वाहन तळासाठी नगर-पुणे रोड वरील विद्यमान जकात नाक्या मागील जागे सह भाडे तत्वावर घेण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट. पहाता कार्यालयाने दर्शविलेले मोकळया जागांचे भाडे हे जास्तीचे असल्याने सदर जागेचे जागा मालकाशी तडजोड करून जागा भाडे कमी करून घेउन विद्यमान जकात नाक्या मागील मोकळया जागा वाहन तळासाठी भाडयाने घेण्यांस मंजूरी देण्यात येत आहे.

मात्र सदर जागेपैकी पोखर्डी सर्व्हे नं.१६७ जागेचे मालक यांना जागा भाडयाने न देणे बाबत पत्र दिलेले असल्याने सदर प्रकरणी कायदेशीर बाजू तपासून पुढील कार्यवाही करण्यांस तसेच जागा भाडया विषयी तडजोड (निगोशिएशन)करण्यांचे अधिकार मा.आयुक्त साहेब अहमदनगर महानगरपालिका यांना देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

अनुमोदक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-५**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक -६ मंगळवार दिनांक.२६/६/२००७

ठराव क्रमांक -६ मंगळवार दिनांक.२६/६/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव येथील अंबिकानगर भागामधील रस्त्यांचे डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्यावरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय केडगांव येथील अंबिकानगर भागामध्ये अंबिकानगर येथे रस्ता डांबरीकरण करणे

मा.सादर,उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, उपरोक्त कामास प्रशासकीय मान्यते नुसार वरील कामाचे दरपत्रक दिनांक २१/४/२००७ ते ३० /४/२००७ अखेर मागविण्यांत येउन दिनांक ५/५/२००७ रोजी दरपत्रक मा.उपायुक्त साहेब यांचे दालनात उघडले असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलणात्मक तक्ता खालील प्रमाणे....

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | अंदाजपत्रका पेक्षा जास्त % |
|---|---|---|
| १. | श्री.एम.व्ही.दराडे | ६.०० % |
| २. | श्री.अभिजीत जोशी | ८.०० % |
| ३. | श्री.मंगेश देवचक्के | १३.०० % |

सदरचा तुलणात्मक तक्ता पहाता त्यामध्ये श्री.एम.व्ही.दराडे यांचे आलेले दर निविदा दरापेक्षा ६.०० जादा परंतु सर्वात कमीचे प्राप्त झालेले आहेत.

सदर कामाचे अंदाजपत्रक सन २००५-२००६ चे दरसुची नुसार तयार करण्यांत आले असुन अंदाजपत्रका पेक्षा ६.०० % जादाचे दर अवाजवी असल्याने श्री.एम.व्ही.दराडे यांना दराच्या वाटाघाटी साठी दि.८/५/०७ रोजी छाननी समितीपुढे बोलविले असता सदर काम सन २००६-०७ चे दरसुची पेक्षा ५ % जादा दराने देणेचे छाननी समितीने शिफारस केली आहे.

तरी छाननी समितीचे शिफारसी नुसार मंजुरीस्तव रिपोर्ट सविनय सादर (सोबत-छाननी समिती अहवाल)

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री.सोनटक्के व्ही.जी. यांचा अहवाल असे. दि.४/६/०७

शहर अभियंता श्री.मगर एन.बी. :- छाननी समितीच्या अहवालानुसार मंजुरीस्तव सादर.(सन०६-०७ च्या दरसुची पेक्षा ५ % जादा दराने ) दि.७/६/२००७.

अं.लेखापरिक्षक :- प्रस्ताव 'अ' प्रमाणे (५ % adove) मान्यता देणेस हरकत नाही दि.७/६/०७

मा.उपायुक्त साहेब (सा) :- प्रस्ताव मान्यते साठी मा.स्थायी समिती कडे सादर करणेस मान्यते साठी सादर

मा.आयुक्त साहेब :- डांबरी करणाची कामे पावसाळयानंतर करावी अशा सुचना या अगोदरच दिलेल्या आहेत. तशी समिती समोर माहिती द्यावी. दि.१५/६/२००७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव येथील अंबिकानगर भागामधील रस्त्यांचे डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्यावरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.जोशी अ.सु. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा. आमचे भागातील कामे ही त्वरीत मार्गी लावावीत.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. व मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफीस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव येथील अंबिकानगर भागामधील रस्त्यांचे डांबरी करण करणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मकदृष्टया कमीचे निविदा दर धारक यांनी निगोशिएशन नंतर छाननी समितीचे शिफारसी नुसार कमी करून दिलेल्या अंदाजपत्रकीय रकमे पेक्षा पांच टक्के जादाचे दरास मंजूर देण्यात येत आहे.ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.
सुचक :- मा.श्री. त्रिपाठी सु.चं.
अनुमादेक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.
ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.